**नियमित दिवाणी दावा क.६०/२०१८**
**माधो चौधरी-वि- ग्रामपंचायत व इतर**

**आदेश नि.५ वर**
(पारीत दि.२२.०६.२०१८)

अर्जदाराने घोषणेचा व मनाई हुकूमाचा दावा दाखल केला आहे. त्या दाव्यासोबत आदेश ३९ नियम १ व २ नुसार तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

२. वादीच्या म्हणण्यानुसार तो मौजा विरली येथील रहिवाशी असून त्याने २० ते २२ वर्षापासून २५ x २८ = ७०० चौ.फुट असा गोठा बांधला आहे. तो त्याची गुरे बांधतो व चाराही ठेवतो. आजपर्यंत त्या जागेसंबंधी कोणत्याही गावक-यांनी उजर घेतला नाही. गैरअर्जदाराने दि.२५.२.२०१८ रोजी अतिक्रमण केल्यासंबंधी नोटीस दिली. त्यानंतर अर्जदाराने गैरअर्जदाराला भेटून त्याने चुकीचे नोटीस पाठविल्यासंबंधी खुलासा दिला. खुलासा समाधानकारक वाटल्यामुळे अर्जदारावर कार्यवाही करण्यात आली नाही. त्यानंतर पुन्हा एप्रिल महिन्यामध्ये सरपंचाने अर्जदाराचे मुलाला अतिक्रमण हटविण्यासंबंधी नोटीस पाठविली. त्यानंतर अर्जदाराने गैरअर्जदाराला जावून भेट दिली व स्वत:चे मालकीचा गोठा असल्याचे सांगितले.

३. अर्जदाराचे वकील श्री. पोंगडे यांनी दि.३०.५.१८ रोजी नोंदणीकृत नोटीस पाठवून सदर अतिक्रमण सरकारी जागेवर असल्याचे कळविले. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार त्याने शासनाच्या जागेवर अतिक्रमण केले व शासनाने त्यावर आजपर्यंत कार्यवाही केली नाही. गैरअर्जदार गावातील राजकारणामुळे अर्जदाराचा गोठा सुडबुध्दीने पाडण्याची कार्यवाही करेल अशी भिती निर्माण झाली आहे. त्यामुळे हा अर्ज अर्जदाराने न्यायालयात दाखल केला आहे.

४. अर्जदाराचे म्हणण्यानुसार त्याची केस सकृतदर्शनी असून दाव्याचा समतोलपणा त्याचे बाजूने आहे. जर तात्पुरता मनाईचा आदेश केला नाही तर त्याचे

अपरिमित नुकसान होईल.

५. मी अर्जदाराचे अर्जाचे अवलोकन केले तसेच अर्जदाराने नि.४ वर दाखल केलेल्या दस्ताचे अवलोकन केले. अर्जदाराने ग्राम पंचायत विरली यांनी दिलेले नोटीस अभिलेखावर दाखल केले आहे. त्यावरून ग्राम पंचायत हद्दीत अर्जदाराचा गोठा असल्याचे सिद्ध होते. अर्जदाराने अभिलेखावर त्याचे गोठयाचे फोटोग्राफ दाखल केलेले आहे. त्यावरून अर्जदाराचा गोठा हा रस्त्यावर नसल्याचे दिसून येते. ग्राम पंचायतीला शासकीय जागेवरून अतिक्रमण काढणेवरून मा.जिल्हा न्यायालयाची परवानगी घ्यावी लागते तसेच वादीचा गोठा हा २० वर्षापूर्वी असल्याचे वादी कथन करतो. वादीने दाखल केलेल्या फोटोग्राफ वरून त्याने बांधलेला गोठा हा त्याने बांधलेला नसल्याचे स्पष्ट होते. गैरअर्जदारास ऐकून घेण्यापूर्वी जर मनाई हुकूमाचा आदेश माझे मते दिला नाही तर गैरअर्जदार त्याचा गोठा पाडून टाकील त्यामुळे अर्जदारास कुठलाही उपाय राहणार नाही. तसेच सध्या पावसाळी ऋतू असल्याने मुक्या जनावरांना गोठयाची फार आवश्यकता असते. त्यामुळे प्रतिवादी हजर होईपर्यत तात्पुरता मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादीचे काही नुकसान होणार नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करतो.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशत: मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने दाव्यात हजर होईपर्यंत वादीच्या गोठयाला काहीही अडथळा करू नये किंवा पाडू नये.

३. वादीने आदेश ३९ नियम ३ प्रमाणे कार्यवाही करावी.

स्वाक्षरी/-

उमरेड,
दिनांक : २२.०६.२०१८

(अ.वि. पंडित)
सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
नागपूर